*BHIWANDI NIZAMPUR
CITY MUNICIPAL
CORPORATION
BHIWANDI (Dist. Thane)
MAHARASHTRA
OLD S.T.STAND, KAP-ALI,
BHIWANDI - 421 302, DIST.THANE.*

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,
भिवंडी, जि.ठाणे
महाराष्ट्र,
जुना एस.टी.स्टॅण्ड,कापआळी,
भिवंडी - ४२१ ३०२, जि.ठाणे.

*TEL : 02522-55314/55315, FAX : 02522-52074*

जा.क्र./भिनिशमनपा/नगररचना/बा.प्र.क्र. ६२/२०१५-१६/२८८५ दि.१०/०२/२०१६

## प्रारंभ प्रमाणपत्र

प्रति,
श्री.लक्ष्मण शिवा नाईक व इतर -२ तर्फे
मुखत्यारपत्रधारक मे. लाभ बिल्डर्स अँण्ड डेव्हलपर्स
श्री. प्रल्हाद डी. डागा
द्वारा : मे.आकृती कन्सल्टंट
ए-२/विंग आनंद सावली, काजूवाडी,ठाणे

**विषय :- बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**मौजे- टेमघर येथील स.नं. ११०/९ पै.**
**संदर्भ :-१) या कार्यालयाकडील बांधकाम परवानगी क्र.न.र.वि./ २७२४ दि. ०३/०२/२०१६.**
**२) आपला अर्ज दि. ०९/०२/२०१६ रोजीचा अर्ज.**

महोदय,

उपरोक्त विषयांकीत जागेमध्ये आपणांस बांधकाम परवानगी संदर्भ क्र.१ अन्वये मंजूर करणेंत आली आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ मधील अर्जान्वये बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र अपेक्षिलेले आहे. सबब आपणांस कळविण्यांत येते की, **मंजुर बांधकाम परवानगीतील अटी/ शर्तींच्या व खालील अटी / शर्तींच्या अधिन राहून इमारतीचे बांधकाम प्रारंभ करण्यास अनुमती देण्यात येत असून त्यानुसार जोत्यापर्यंत बांधकाम पूर्ण करावे** व त्यानंतर जोता तपासणी प्रमाणपत्र मिळणेसाठी विकास नियंत्रण नियमावलीतील अपेंडीक्स "XII" नुसार अर्ज करावा व अपेंडीक्स "XIII" नुसार जोता तपासणी प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतरच जोत्यावरील पुढील बांधकामास सुरुवात करावी.

१. प्रस्तुत बांधकाम प्रकरणांत प्रकल्पातील नियुक्त आर्किटेक्ट/इंजिनिअर यांची नियुक्ती रद्द करता येणार नाही अथवा आर्किटेक्ट/इंजिनिअर यांना प्रकल्प सोडता येणार नाही. प्रस्तावित बांधकाम हे मंजूर बांधकाम नियंत्रण नियमावलीनुसार व अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशाच्या मर्यादेमध्ये होईल याची सर्वस्वि जबाबदारी संबधित आर्किटेक्ट/इंजिनिअर यांची राहील.

२. भुखंडाच्या महसुली हद्दीनुसार तसेच विकास योजना रस्त्याच्या रुपरेषे (Alignment) नुसार कुंपणांचे बांधकाम करणे अर्जदारावर बंधनकारक राहील अशा मंजूर नकाशाच्या हद्दीप्रमाणे सामासिक अंतरे जोता तपासणी वेळी उपलब्ध होतील याची सर्वस्वी जबाबदारी ही अर्जदाराची राहील.

३. प्रस्तावित बांधकामास जोता तपासणी प्रमाणपत्र व वापर दाखला घेतल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये अन्यथा तो अनधिकृत समजून कार्यवाही करणेत येईल.

४. प्रस्तुत प्रकरणांतील उपकराची रक्कम ही प्रारंभ प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या दिनांका पासून एक वर्षाच्या आंत अथवा जोता तपासणी प्रमाणपत्रापूर्वी जमा करणे बंधनकारक राहिल.

५. तसेच संदर्भ क्र. १ अन्वये मंजुर बांधकाम परवानगीतील इतर अटी/शर्तीचे देखील पालन करणे आपणांवर बंधनकारक आहे.

आपला,

(र.स.राठोड)
सहाय्यक संचालक,नगररचना
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.
भिवंडी.

प्रत :- प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र.२ यांना माहितीसाठी रवाना.